महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/महाडीबीटी २०२०-२१/२०२१/ 314 दिनांक : २०.०१.२०२१

20 JAN 2021

महत्वाचे परिपत्रक

प्रति,
संचालक/प्राचार्य,
तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित संस्था
पुणे विभाग.

विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील महाडीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेबाबत..

संदर्भ : १) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. संकिर्ण-२०२०/प्र.क्र.०२/तांशि-४ दिनांक ०८.०१.२०२१.
२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र जा.क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकापु/२०२०-२१/१९ दिनांक १४.०१.२०२१.

उपरोक्त विषयास अनुसरुन, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये कोवीड-१९ आजाराच्या प्रादुर्भावामुळे अद्यापपर्यंत शैक्षणिक संस्था सुरु करण्यात आलेल्या नाहीत. याबाबत तंत्रशिक्षण संचालनालयाकडून राबविण्यात येणा-या डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना २०२०-२१ च्या अंमलबजावणीबाबत शासन स्तरावरुन आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे. तरी, सदर शासन पत्रामधील नमूद मुद्यांचे काटेकोरपणे अनुपालन करुन त्याची अंमलबजावणी करण्याकरीता सूचित करण्यात येत आहे. सोबत संदर्भ क्रमांक १ मधील शासन पत्राची प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

सोबत : संदर्भ क्र. १ मधील शासनाचे पत्र.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग

दूरध्वनी क्र ०२२-२२०४०९३५.
Email ID : sanjay.dharurkar@nic.in

मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२

क्रमांक : संकिर्ण-२०२१/प्र.क्र.०२/तांशि-४ दिनांक : ८ जानेवारी,२०२१

पत्र प्राप्त झाले
11 JAN 2021
आयुक्त शिक्षण
तंत्र शिक्षण संचालनालय,
३, महाकवि कालिदास मार्ग, मुंबई-३२

तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई
नोंदणी क्र. ९००
दिनांक १८/१/२०२१
कार्यासन क्र. ९

प्रति,
सचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

विषय :- महाडीबीटी पोर्टलव्दारे राबविण्यात येणाऱ्या डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजनेबाबत - २०२०-२१

वरील विषयाबाबत आपले संदर्भाधिन दिनांक २३/१२/२०२० चे पत्र कृपया पहावे.

२. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये कोविड-१९ च्या आजाराच्या प्रादुर्भावामुळे अद्यापपर्यंत शैक्षणिक संस्था सुरु करण्यात आलेल्या नाहीत. मात्र ऑन-लाईन अभ्यासक्रम सुरु असल्याने विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील अभ्यासक्रम पूर्ण करीत आहेत. त्यांच्या उपस्थितीची नोंद महाविद्यालयात होत आहे. तथापि, विद्यार्थी स्वत: चे घर सोडून महाविद्यालयाच्या ठिकाणी वसतिगृहामध्ये अथवा अन्य खाजगी घरामध्ये राहत नाहीत. त्यामुळे दिनांक २२/२/२०१८ च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद-२ मध्ये अट क्रमांक ९ मध्ये नमूद केल्यानुसार विद्यार्थ्यांनी वसतिगृहात प्रवेश घेतल्याचा पुरावा देण्याची अट पूर्ण होत नसल्याने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता पूर्ण दराने निर्वाह भत्ता अनुज्ञेय करण्यात येऊ नये.

३. चालू शैक्षणिक वर्षातील शैक्षणिक संस्था नियमित सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी वसतिगृहात प्रवेश घेतल्यास अथवा अन्य ठिकाणी राहण्याची व्यवस्था केल्यास त्यानंतर त्या पुराव्याच्या आधारे व इतर विहित केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता होत असल्यास उर्वरित कालावधीकरीता निर्वाह भत्ता अनुज्ञेय करण्यात यावा. मात्र जे विद्यार्थी ऑन-लाईन शिक्षणाकरीता महाविद्यालयाच्या ठिकाणी वसतिगृह अथवा अन्य खाजगी जागेत रहात असल्यास त्याची खात्री करुन त्यांना पूर्ण दराने निर्वाह भत्ता अनुज्ञेय करण्यात यावा.

(संजय औ.धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

E:\२१.०१.२०२०\संजय Dharurkar\NBK\सन २०२१\नोट व पत्रे\प्र.क्र.२-२१ - डीबीटी पोर्टलव्दारे राबविण्यात येणाऱ्या डॉ.पं.दे.वस.नि.भ.यो. २०-२१.docx